**GURU : THE INDWELLING CONSCIOUSNESS**

The great Guru is the indwelling Consciousness within, ever available. It is that great Guru who has appeared to you in and through a human being, a teacher. The Guru is ever with you in the depth of your heart, prompting you, moving you, guiding you. You are never alone, ever for a split second of time. You are always under the gracious protecting presence of your Guru. Wherever you may be, in the Arctic wilderness, on the top of the Mount Everest or in the vast Pacific Ocean, He is within you. The Guru never leaves the soul. He has called. He walks with you when you walk. He rests with you when you rest. He broods over you while you slumber. He is the one being who is eternally yours and always with you. Become ever aware of this companionship and keep on going upward and ever upward. Success will be yours.

The Guru should not mean to you some sort of extraordinary, unparalleled earthly personality in the history of India or of the world. No! Then you will be doing injustice to the Guru. You will be falling far short of the requirement of a true awakened spiritual seeker and aspirant. The Guru should be a living ideal before you, to be lived once



again through yourself. You must manifest within yourself all that is highest, best, noblest and sublime that the Guru was, that the Guru stood for, that the Guru declared, that the Guru urged everyone to become. The Guru called forth to the whole world: “This is what you are! This is what you must become!”

He came here to proclaim in powerful words your undeniable divinity, your perfection. You are already perfect, perfection is already there in seed form, make it blossom forth. This was his call. The Guru must be to you that call, ever resounding in your heart as well as in your ear. Guru should become a living force in your life now and in future. That would be indeed the greatest worship offered to the Guru. He should become to you a living, transforming, elevating force, never allowing you to slide back, being a rock supporting you from behind, a lamp unto your feet, a light upon the path and the propelling force for you to move ever forward towards the goal. Make the Guru, that in your life —something effective, something powerful. This is my sharing through the will of God and through the blessings of the benign Guru.



**घानामधले हिंदू:**

घाना हा पश्चिम अफ्रिकेतला एक छोटासा देश. आपल्यानंतर बरोबर एका दशकाने, म्हणजे१९५७ मध्ये घानाला स्वातंत्र्य मिळालं.

आफ्रिकन हिंदू मोनास्टरी हा हिंदू धार्मिक आश्रम आफ्रिकन स्वामी घनानंद सरस्वती ह्यांनी १९७५ साली स्थापन केला. हिंदू धर्माची दीक्षा घेणारे आफ्रिकेतले ते पहिले काळे संन्यासी. स्वामी घनानंद यांचं पूर्वाश्रमीचं नाव होतं गाईड. स्वामीजींचा जन्म झाला होता तेव्हा त्यांचे आई–वडील घानाचा पारंपारिक धर्म पाळायचे, पण पुढे मिशनऱ्यांच्या प्रभावाखाली येऊन ते पूर्ण कुटुंब ख्रिस्ती झालं. पण गाईडचं काही त्यातून समाधान झालं नाही. त्याला पडलेल्या प्रश्नांची उत्तरं गाईडला बायबलमध्ये सापडत नव्हती. त्या उत्तरांच्या शोधत असतानाच कधीतरी त्याच्या हातात गीता पडली, आणि त्याला एकदम वाटून गेलं की, आपण शोधत होतो ते तत्वज्ञान हेच आहे. गीता वाचून तरूण गाईड भारताच्या वाटेवर पोचला. भारतात ऋषीकेशला स्वामी शिवानंदांच्या आश्रमामध्ये राहून वेदाभ्यास करत असताना गाईडने हिंदू धर्म स्वीकारण्याचा निर्णय घेतला आणि संन्यास घेण्याचाही. स्वामी शिवानंदाचे शिष्य स्वामी कृष्णानंद यांनी गाईडला संन्यास दीक्षा दिली आणि गाईडचा स्वामी घनानंद ह्या नावाने पुनर्जन्म झाला.

भारतात काही वर्षे राहून संस्कृत भाषा आणि वेद–वेदांत ह्यात पारंगत होऊन स्वामी घनानंद मायदेशी परत गेले आणि त्यांनी आफ्रिकन हिंदू मोनास्टरी ह्या नावाने आश्रम सुरू केला. घानामध्ये आज जवळजवळ साडेबारा हजार लोक धर्माने हिंदू आहेत, त्यातले दहा हजार लोक आफ्रिकन वंशाचे

आहेत. घानाची राजधानी अकरा येथे स्वामी घनानंदानी बांधलेले सुंदर मंदिर आहे. तिथे सकाळ संध्याकाळ शास्त्रोक्त पूजा चालते. गणेश चतुर्थीला तिथले लोक व्यवस्थित धोतर-बितर नेसून गणपती बसवतात. साग्रसंगीत आरत्या करतात. नवरात्र, शिवरात्र सगळ्या पूजा त्या मंदिरात होतात. अस्खलित संस्कृतात पूजा सांगणारे पुरोहितही आफ्रिकन आणि भक्तिभावाने पूजा करणारे भक्तही आफ्रिकन. मूळ भारतीय वंशाचे काही हिंदूही घानामध्ये आहेत आणि त्यांनीही बांधलेल एक वेगळं हिंदू मंदिर आहे, पण स्वामी घनानंदानी बांधलेल्या मंदिरामध्ये भारतीय वंशाचे हिंदू लोकही उपासनेसाठी येतात.

अर्थात ख्रिस्ती आणि इस्लामी धर्माचं प्राबल्य असलेल्या घानामध्ये हिंदू धर्माचं पालन करणे सोपं नव्हतंच. स्वामी घनानंदानी एका मुलाखतीत सांगितलं होतं की सुरूवातीला त्यांना खूप त्रास झाला. त्यांचे स्वत:चेच कुटुंबीय त्यांना समजून घेत नव्हते. पण हळू हळू त्यांची प्रवचनं, विचार ऐकून लोक यायला लागले. आपणहून हिंदू धर्मावरची पुस्तकं वाचायला लागले. स्वामीजी म्हणाले की मी कुणालाही धर्म बदल म्हणून सांगायला गेलो नाही. मी फक्त वेदांवर, उपनिषदांवर, गीतेवर भाष्य करायचो. हिंदू तत्वज्ञानच इतकं सुंदर आहे की लोक स्वत:हून ह्या तत्वज्ञानाकडे आकर्षित व्हायला लागले. स्वामीजींनी हिंदू धर्मावर चौदा पुस्तके लिहीली आहेत.



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

* जून २०१७ चा सत्संग श्री. लष्करे यांच्या घरी दि. १७ ला संपन्न झाला.
* जून महिन्याच्या ''दिव्य जीवन'' या मासिक पत्रिकेचा अंक परिवारातील सदस्यांना वितरीत करण्यात आला.
* श्रीमती प्रतिभा हनुमंत देशपांडे यांनी शाखेला रू.2000ची देणगी दिली.
* दरवर्षीप्रमाणे यंदाही शाखेच्या वतीने बाराव्या राज्यस्तरीय आंतरशालेय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

### पुणे शाखेचा पत्ता

श्री. गो. आ. नगरकर
'स्वानंद एस् २०,
सहजीवन सोसायटी,
पर्वती, पुणे ४११००९
मो. ९३७०५७०२०६

श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य'
प्लॉट नं. ४९/सायंतारा,
डी.एस.के. विश्व, धायरी,
पुणे ४११०४१
मो.नं. ९८५०९३१४१७
९८५०८२६९९०

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



वर्ष १२/अंक ७
जुलै २०१७
दिव्य जीवन संघ, पुणे शाखा

यंदाच्या जुलै महिन्यात आपल्या शाखेच्या वतीने दोन उपक्रम आहेत. दि. ९ जुलै रोजी गुरूपौर्णिमेनिमित्त श्री. नगरकर काकांच्या घरी सकाळी १० वाजता स्वामीजींच्या पादुकांचे पूजन आणि प्रसाद हा कार्यक्रम आहे.

१४ जुलै हा स्वामी शिवानंद सरस्वती यांच्या महासमाधीचा दिवस! यादिवशी दरवर्षी आपण स्वामी शिवानंद स्मृती व्याख्यानाचे आयोजन करीत असतो. यंदा सौ. राजलक्ष्मी देशपांडे यांचे ''स्वामी शिवानंद सरस्वती-जीवन आणि कार्य'' या विषयावर सायंकाळी ५.३० वाजता ज्येष्ठ नागरिक संघ, डीएसके विश्व येथे व्याख्यान ठेवले आहे. परिवारातील सदस्यांनी याचा जरूर लाभ घ्यावा.